# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र




०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४४५ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- १८/०८/२०१८

## विशेष वार्तापत्र

**पोलीस स्टेशन भंडारा**:– अपराध क्रमांक ६४३/२०१८ कलम ३७९, भांदवि सहकलम ६६ (डी) मा. तंत्र कायदा २००० मधील फिर्यादी नामे छबी महेश नगराडे वय २७ वर्ष, रा. वैशाली नगर भंडारा यांनी दिनांक १७/०८/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने मुसलमान फकीरी वेशात फिर्यादीचे घरी भिक्षा मागण्याचे बाहाण्याने आला असता फिर्यादी ही भिक्षा आणण्यास घरात गेली असता यातील अज्ञात आरोपीने समोरच्या खोलीतील पलंगावर ठेवलेल्या फिर्यादीच्या पर्स मधुन ए. टी. एम. कार्ड चोरुन नेल्याने पळुन गेला. व नंतर फिर्यादीचे बॅक खात्यातुन १०,०००/–रु. विड्राल झाल्याचे मॅसेज फिर्यादीच्या मोबाईलवर आली असता फिर्यादीने पोस्टेला तक्रार दिली. असल्याने पोलीस स्टेशनचे ठाणेदार पोलीस निरीक्षक सुधाकर चव्हाण तपास करीत आहेत.

भंडारा जिल्हयात अश्या प्रकारे घटनेचा प्रकार घडणार नाही याची दक्षता सर्व नागरीकांनी घ्यावी. फेरीवाले, तसेच भिक्षा मागणारे आल्यास, त्याच्यावर नजर ठेवणे, अनोळखी इसम, संशयीत व्यक्ति आढळल्यास त्याबाबतची माहीती पोलीस स्टेशन भंडारा दुरध्वनी क्र. ०७१८४–२५२३०३ किंवा पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील दुरध्वनी क्र. ०७१८४–२५२४०० व टोल फ्री क्र. १०९१ वर तात्काळ संपर्क करावे. तसेच वॉट्सअप क्र. ९४०५८३११०० व ९४०५८४११०० वर तात्काळ मॅसेज करावे. असे सर्व जनतेला पोलीस अधीक्षक भंडारा यांचेकडुन आवाहन करण्यात येत आहे.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
दुरध्वनी.क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.